# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/05/2021 (शुक्रवार)

## प्रतिबंधीत बियाणे विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्यावर कार्यवाही
## एकुण 1,05,13,700/-रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक 26/05/2021 रोजी बौद्ध पोर्णिमा बंदोबस्त पेट्रोलिंग दरम्यान पोलिस स्टेशन केळवद चे ठाणेदार पोनि श्री दिलीप ठाकुर हे पो. स्टे. परिसरात पेट्रोलिंग करीत मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, मध्य प्रदेशातुन पांढुर्णा ते नागपूर या महामार्गाने खुर्सापार आरटीओ चेक पोस्ट मार्ग आयशर कंटेनर एमएच- 40/एन-9495 या वाहनातुन प्रतिबंधीत कापुस बिटीबियानेची वाहतुक होत आहे. अश्या माहिती वरून पो. स्टे. केळवद चे पोलिस निरीक्षक श्री. दिलीप ठाकुर सोबत पो. स्टे. केळवद मधील स्टाफ यांनी पांढुर्णा नागपूर महार्मागावरील बिहाडा फाटा येथे नाकाबंदी लावून वाहन चेक करीत असतांना रात्री 20.00 वा. दरम्यान पांढुर्णा कडुन नागपूर कडे जाणारी आयशर कंटेनर क्र. एमएच- 40/एन-9495 हे वाहन येतांना दिसले. तेव्हा सदर कन्टेनर वाहनाचे चालकास थांबवुन त्याचे वाहनाची पाहणी केली असता त्यात कन्टेनर चे चालक याने त्याचे नाव आरोपी क्र. 1. सुरेंद्र पर्वतसिंग धाकड, वय 25 वर्ष, रा. कुरैया बुध्द पोस्टे बरोदिया ताजी अशोक नगर, एमपी असे सांगितले. नमुद कन्टेनर वाहनामध्ये शेतक-याला व शासनाला फसविन्याच्या उददेश्याने स्वतःच्या आर्थीक फायदयासाठी विक्री करण्याच्या उददेशाने प्रतिबंधित संकरीत बीटी/एचटिबीटी कापुस बियाने हे पुढील प्रमाने 1) मेघना 45 चे 2850 पॅकेट, 2) विटगार्ड चे 2900 पॅकेट, 3) आरकट 18 चे 500 पॅकेट, 4) कल्पवृक्ष चे 2000 पॅकेट, 5) विजया चे 650 पॅकेट, 6) काव्या चे 1000 पॅकेट, 7) राघवा 9 चे 900 पॅकेट, 8) बी - 555 चे 150 पॅकेट, 9) बी - 555 चे 150 पॅकेट एकुण 11.100 पॅकेट प्रती पॅकेट 767/रु. प्रमाने एकुन किंमती 85,13,700/- रु. असा माल बीना परवाना व अनाधीकृतपणे विक्री करण्याकरीता वाहतुक करतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन कापुस बियाणे व आयशर कंटेनर क्र. एमएच- 40/एन-9495 कि. 20,00,000/-रू. असा एकुण कि. 1,05,13,700/-रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आरोपी क्र. 1. सुरेंद्र पर्वतसिंग धाकड, वय 25 वर्ष, रा. कुरैया बुध्द पोस्टे बरोदिया ताजी अशोक नगर, एमपी व प्रतिबंधीत कापुस बियाणेचा पुरवठा करणारा आरजीटी ट्रान्सपोर्ट चे मालक आरोपी क्र. 2. नामे- महाविर पाल रा. पंचवटी इंदोर मध्यप्रदेश यांचे विरूद्ध पोलिस स्टेशन केळवद येथे अप क्र 94/2021 कलम 420, 34 भादवी सहकलम 6,7 कापुस बियाने विनीयम अधिनियम सहकलम 3 बियाने विनीयम अधि सहकलम बिज अधिनियम 1968 चे अधिनियम 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14 सहकलम महाराष्ट्र कापुस बियाने कायदा 2009 चे नियम 10, 11, 12, 13, 14 आणि नियम 2010 चे नियम 10 सह कलम 278, 15, 16 पर्यावरन संरक्षण कायदा 1986 कायदा अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोनि श्री. दिलीप ठाकुर हे करित आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री दिलीप ठाकुर, पोउपनि श्री अर्जुन राठोड, नापोशी रविन्द्र चटप, पोशी सचिन येळकर, श्रीधर कुलकर्णी, धोंडुतात्या देवकते व दोन होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.



## विनयभंग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– दि. 27/05/2021 चे 15:00 वा. चे सुमारास 14 वर्षीय फिर्यादी/पीडित अल्पवयीन मुलगी हिचे कोंबडयांनी आरोपी नामे– सागर सिताराम उईके, वय 18 वर्ष रा. बिडगणेशपूर यांच्या अंगणात घाण केली असता ती घाण साफ करून पीडिता घरी परत जात असतांना आरोपीने तिला आवाज देवून थांबवून आरोपीने तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ) भादंवि. सहकलम 8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि काकडे 9156283876 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावर मोहदी धोत्रा रोड, नरखेड येथे दिनांक 22/04/2021 चे 11:00 वा. ते 11.11 वा. दरम्यान हायड्रा क्र. एमपी– 48/डी– 0796 च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे आपले वाहन चालवुन राजकुमार जैन यांचा बजाज पलसर एमपी– 48/एमव्ही– 3791 या मोटरसायकला मागुन धडक मारून त्याचे मरणास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अभिषेक राजकुमार जैन, वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र 14 इंदिरा वार्ड जि.बैतूल एम पी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री बोथले हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावर डुमरी कला आशु धाबा समोर येथे दिनांक 26/05/2021 चे 22:40 वा. ते 23.15 वा. दरम्यान अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या जावायाची एमएच– 49/बीएफ– 7280 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार फिर्यादीचा जावाई यांचे गंभीर जखमी होण्यास व मोटरसायकलवर मागे बसलेली फिर्यादींची पत्नी सौ. बेबी शकुना रामसिंग वाघाडे, वय 50 वर्षे हिचे डोक्याला जबर मार लागुन ति जागीच मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामसिंग भगवान वाघाडे वय 52 वर्ष, रा. केकडई ठाणा बरघाट जि.शिवनी म.प्र ह.मु चिचदा उमरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री पळनाटे 7387086178 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर